# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २९ फेब्रुवारी २०२४

## ( बैठक क्र. ६६ )

### (विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठक)

| अक्र | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी सुधारित मान्यता | जलसंपदा |
| २ | महानगरपालिकांमध्ये ४ सदस्यीय प्रभाग पद्धत | नगर विकास |
| ३ | नवी मुंबईत श्री पद्मावती अम्मावरी मंदीरासाठी जागा | नगर विकास |

जलसंपदा विभाग

## काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी सुधारित मान्यता

काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी १६७० कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर काळ धरणाच्या खालील बाजूस असलेल्या महाड शहरास पुराचा धोका कमी होणार असून पर्यटनास चालना मिळणार आहे. उद्योगांसाठी २० दलघमी पाणी पुरवठाही करता येईल. कुंभे उदंचन जलविद्युत प्रकल्पाद्धारे १००० मेगावॅट वीज निर्मितीचे देखील नियोजन आहे.

-----o----

नगर विकास विभाग

## महानगरपालिकांमध्ये ४ सदस्यीय प्रभाग पद्धत

शहरांतील प्रश्नांचे निराकरण वेगाने करण्यासाठी बहुसदस्यीय प्रभाग पद्धती उचित होऊ शकते. यामुळे महानगरपालिकांमध्ये ४ सदस्यीय प्रभाग पद्धत सुरु करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तोपर्यंत ४ पालिका सदस्य, परंतु ३ पेक्षा कमी नाहीत आणि ५ पेक्षा अधिक नाहीत अशी सुधारणा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये करण्यात येईल. बहुसदस्यीय प्रभागाची तरतूद बंद झाल्यामुळे १ पद्धतीय प्रभाग पद्धत लागू होती. २०२२ मध्ये ३ प्रभागांची पद्धत लागू करण्यात आली.

-----o-----

नगर विकास विभाग

## नवी मुंबईत श्री पद्मावती अम्मावरी मंदीरासाठी जागा

नवी मुंबई येथील उलवे भागात श्री पद्मावती अम्मावरी मंदीरासाठी सिडकोमार्फत जागा देण्याच्या निर्णयास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डाच्या विनंतीनुसार श्री व्यंकटेश्वराच्या मंदिरासाठी वाटप करण्यात आलेल्या भूखंडालगतच हा भूखंड असेल. उलवे नोडमधील सेक्टर १२ मधील भूखंड क्रमांक ४ हा १.४६ हेक्टरचा भूखंड सिडकोच्या नियमाप्रमाणे राखीव किंमतीच्या १०० टक्के दर निश्चिती करून आणि भाडेपट्टा शुल्क आकारून प्रचलित चटई क्षेत्र निर्देशांकासह थेट वाटप करण्यात येईल.

-----o-----